पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९५३ /२०१४
दिनांक : २८/११/२०१४

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०३/१२/२०१४** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/१२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ०९**

दिनांक : **०३/१२/२०१४** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०३/१२/२०१४** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जाहिरप्रकटनाद्वारे अर्ज मागविले असता मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत एकूण ३९६२ अर्ज प्राप्त झाले असून या अर्जांची तपासणी प्रक्रीया चालू असून त्यामध्ये अंदाजे ६०% अर्ज पात्र होण्याची शक्यता वाटते. म्हणजेच प्राप्त अर्जांपैकी अंदाजे एकूण २४०० अर्ज पात्र होतील असे मत आहे. म्हणजेच या दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान एकूण ४७७५ सायकली खरेदी करणे अपेक्षित असल्याने या दोन्ही आर्थिक वर्षासाठी किमान अंदाजे एकूण ५००० सायकली खरेदी कराव्या लागणार आहेत. सदरच्या सायकली गतवर्षीच्या खरेदी किंमतीमध्ये १०% दरवाढ विचारात घेता अंदाजे रक्कम रुपये ३,८३०/- प्रती नग या दराने खरेदी कराव्या लागतील त्यानुसार एकूण रक्कम रुपये १,९१,५०,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एक्याण्णव लाख पन्नास हजार फक्त ) इतका खर्च अपेक्षित आहे. या योजनेसाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६७,५०,०००/- एवढी तरतूद आहे. उपलब्ध तरतूदीचा विचार करता रक्कम रुपये - १,२४,००,०००/- ( अक्षरी रक्कम रुपये एक कोटी चोवीस लाख फक्त ) इतकी तरतूद कमी पडणार असून सदरची तरतूद सुधारित अंदाजपत्रकात करणेत येईल. तरी सदरच्या सायकली खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९५३/२०१४
दिनांक : २८/११/२०१४ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.